<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६९/२०१४ मधील नि. २४ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज वादीतर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळावी याकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरच्या अर्जास प्रतिवादीतर्फे जोरदार आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

०२. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संचिकेचे अवलोकन केले. दाव्यामध्ये वादीने दावा मिळकतीपैकी चार आणे हिश्श्याच्या जमिनीचे क्षेत्र १ एकर १० गुंठे हे अन्य मिळकतीसह वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे आजोबा मयत दाजी गोविंद चव्हाण यांना कुळकायद्याने प्राप्त झालेले आहे असे कथन करुन त्या चार आणे हिश्श्याच्या क्षेत्राचे वाटप मागितले आहे. या प्रकरणी प्रतिवादी नि. १४ वर कैफियत दाखल केलेली आहे. त्यानंतर दि. ०१/०६/२०१५ रोजी वादप्रश्न निश्चीत करण्यात आलेले आहेत. त्यानंतर आता वादीतर्फे सदरचा दुरुस्तीचा अर्ज देण्यात आलेला आहे. वादीचे असे कथन आहे की महसूल दप्तरातील चुकीमुळे दावा मिळकतीच्या अधिकार अभिलेखात वादीचा चार आणे हिस्सा दाखविण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात वादीचा दावा मिळकतीत १० आणे हिस्सा आहे. त्यामुळे चार आणे हिश्श्याऐवजी १० आणे असा शब्दप्रयोग करण्यास व तद्अनुषंगाने दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी म्हणून सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

०३. दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहता त्यावर वादीच्या नावे ४ आणे हिश्श्याची नोंद दिसते. वादीचा दावा मिळकतीत १० आणे हिस्सा आहे असा कागदोपत्री पुरावा पटलावर नाही. जर वादीला त्याचा दावा मिळकतीत १० आणे हिस्सा होता हे माहीत होते तर मग त्याने दावा दाखल करताना दावा मिळकतीत त्याचा १० आणे हिस्सा आहे आणि त्या हिश्श्याचे वाटप करुन मिळावे अशी मागणी करणे शक्य होते. परंतु, तशी मागणी या पूर्वी का

करण्यात आली नाही याचे समाधानकारक स्पष्टीकरण पटलावर नाही. तसेच महसूल दप्तरी काय चुका झाल्या हे देखील स्पष्ट करण्यात आलेले नाही. दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहता प्रतिवादींच्या नावे १२ आणे हिश्श्याची नोंद दिसते. जर वादीचा दावा मिळकतीत खरोखरच १० आणे हिस्सा असेल तर त्याबाबतचे कागदपत्र पटलावर असल्याशिवाय आणि त्याबाबत न्यायालयाचे समाधान झाल्याशिवाय अर्ज मंजूर करता येणे शक्य नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे. जर वादीचा दावा मिळकतीत १० आणे हिस्सा आहे ही बाब त्यांनी न्यायालयाला भविष्यात पटवून दिली तर त्याबाबत वादीला फेर दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यास मुभा राहील.

सही/—

(संतोष द. चव्हाण )

दि. २७/०८/२०१५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.